
# पुरातत्वविद्या अभ्यासक
# समुद्रगुप्त पाटील



संपादक

**डॉ. जगदीश नरहरराव कुलकर्णी**


Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

Scanned with CamScanner

संगत प्रकाशन, नांदेड – १७९
ISBN NO - 978-93-84239-65-7

**Puratatvavidya abhyasak: Samudragupta Patil**

Dr. Jagdish Narharrao Kulkarni

**पुरातत्त्वविद्या अभ्यासक : समुद्रगुप्त पाटील**

(जन्म १९ जून १९३९, निधन १० डिसेंबर २०२१)

संपादक : डॉ. जगदीश नरहरराव कुलकर्णी
वर्गांक. ९२९/कुलक
भ्र : ९४२२८७२८२४

**प्रकाशक**
संजय सुरनर
संगत प्रकाशन
विवेकनगर, नांदेड –५
भ्र : ८१४९८२६४५९

**सर्वाधिकार**
डॉ. जगदीश नरहरराव कुलकर्णी

**मुखपृष्ठ** : संतोष घोंगडे, पुणे

**अक्षरजुळणी**
सौ. कलावती घोडके, नांदेड
भ्र : ९५४५३५१८२०

**मुदितशोधक** : प्रा. डॉ. राम धारासूरकर

**मुद्रक** : विश्री प्रिंटर्स, हैदराबाद

**प्रथम आवृत्ती** : २२ मार्च २०२२

**किंमत** : रु. ३००/–

Shri Guru Buddhiswami Shikshan Prasarak Sanstha's Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn.) Estd.1983

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका


ऋणनिर्देश / ३

संपादकीय / ४

१. चतुर्विंशती विष्णूच्या शक्ती – डॉ. गो. ब. देगलूरकर / ७

२. समुद्रगुप्त पाटील : एक दुर्लक्षित इतिहास संशोधक – डॉ. नागनाथ ... कोत्तापल्ले / १३

३. समुद्रगुप्त पाटील – मराठवाड्याचे भूषण – डॉ. जयसिंगराव पवार / १७

४. पुरातत्त्व शाखेतील प्रज्ञावंत : समुद्रगुप्त पाटील – डॉ. सोमनाथ रोडे / २०

५. साम्राज्य नसलेला सम्राट : समुद्रगुप्त – प्रा. लक्ष्मीकांत तांबोळी /२४

६. संशोधन मार्गावरील स्थितप्रज्ञ यात्रेकरू – डॉ. शरद हेबाळकर / २८

७. समुद्रगुप्त पाटील यांचे लोणारविषयीचे संशोधन व चिंतन – प्राचार्य डॉ. प्रकाशचंद्र व्यास/ ३०

८. समुद्रगुप्त पाटील : संशोधनाचा वाटसरू– प्राचार्य डॉ. बी. एस. ढेंगळे / ३६

९. मृद्घटातील मोहरा – प्रा. माधव कृष्ण सावरगावकर / ३८

१०. तपस्वी समुद्रगुप्त पाटील – डॉ. पी. जे. जोशी अंबुलगेकर / ४४

११. समुद्रगुप्त पाटील : पांढऱ्या कपड्यातील गोसावी–बाळासाहेब माने / ४९

१२. मित्रवर्य समुद्रगुप्त पाटील – मेजर मु. ना. जोशी / ५१

१३. एक ज्ञानयोगी अवलिया : समुद्रगुप्त पाटील – उषा अरविंद एकताटे/ ५३

१४. समुद्रगुप्त पाटील : एक चालता–बोलता इतिहास – डॉ. दीपक कासराळीकर/ ५९

१५. समुद्रगुप्त पाटीलःएक आदर्श व्यक्तिमत्त्व– प्रा. डॉ. शिवसांब कापसे / ६२

१६. इतिहासवेडे पाटील – प्रा. नंदकुमार ग. मेगदे / ६५

१७. एकलव्यी भ्रमंतीकार इतिहास संशोधक–यादवराव गोविंदराव कंदकुर्तीकर / ६८

१८. इतिहासतज्ज्ञ व समाजशील माणूस : समुद्रगुप्त पाटील – प्रा. ई. आर. मठवाले / ८२

१९. इतिहास संशोधक : समुद्रगुप्त पाटील – गोविंद व्यंकटराव थेटे/ ८७

२०. समुद्रगुप्त पाटील यांचे लातूर जिल्ह्यातील पुरातत्त्वीय संशोधन – डॉ. चेतनकुमार व्यास

२१. ऐतिहासिक खाणीतील खजाना : समुद्रगुप्त पाटील – प्रा. दत्तराम पाटील कंदुर्के / ९४

२२. समुद्रगुप्त पाटील : एक पुराण पुरुष – प्रा. रवींद्र दत्तात्रय लाड/ ९६



Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn.) Estd.1983

Scanned with CamScanner

# समुद्रगुप्त पाटील : एक आदर्श व्यक्तिमत्त्व

समुद्रगुप्त पाटील यांची प्रथम भेट कधी झाली आणि त्यांच्याविषयीचं ओढ, आस्था मनात का निर्माण झाली, हे निश्चितपणे सांगणे कठीण आहे. जेव्हा आम्ही भेटलो तेव्हा साधारणतः २००६ हे वर्षे असावे. नांदेडच्या आनंदनगर भागात त्यांची खोली होती. आमच्या इतिहास विषयाच्या मित्रांसोबत त्या खोलीवर गेलो असता एक सत्तरीकडे झुकलेला, धोती घातलेला आणि पुस्तकांच्या जुन्या, नव्या प्रतीची साफसफाई करणारा व्यक्ती नजरेस पडला. सोबत असलेला मित्र राठोड यांनी माझी ओळख आणि बेकारी त्यांच्यापुढे ठेवली. ते ऐकत आपल्या कामात व्यस्त होते, मी पण काही मदत करू का म्हणून विचारताच ते म्हणाले, "आता काय करतूस?" बेकार असणारा व्यक्ती बेकार आहे. असेच म्हणणार, असे मी पण म्हणालो, त्यावर ते म्हणाले, "तुवा विषय मराठी आहे, तर मग टिवीशन सुरू कर की." मी म्हणालो, "टिवीशन मराठीचे कोण लावणार आहे?" अशी आमची चर्चा होत असतांनाच त्यांना त्या पुस्तकातून मराठीचे पुस्तक सापडले अन् मला म्हणाले, "हे घे पुस्तक राहू दे तुला वाचायला." एका अनोळखी असलेला, पहिल्याच भेटीत पुस्तक वाचायला देणारा अन् आस्थेनं विचारपूस करणारा व्यक्ती शहरात मला भेटला, तो म्हणजे समुद्रगुप्त पाटील.

समुद्रगुप्त पाटील यांची भेट अनेकवेळा रस्त्याने होत असे. जेव्हा-जेव्हा भेट होत असे, त्यावेळी ते साहित्यिकांविषयी, साहित्याविषयी चर्चा करत आणि नेमके काय वाचावे याविषयी ते नेमकेपणे सांगतात. माझी आणि समुद्रगुप्त पाटील यांची भेट अनेकवेळा विसावानगर येथील हंगरगेकर यांच्या घरी झाली. नोकरीच्या शोधात अनेक महाविद्यालयांत मुलाखती देऊन त्यात आलेले नानाविध अनुभव मी त्यांच्यापुढे मांडत असे. तेव्हा त्यांच्या अनेकवेळा प्रखर वास्तववादी विचारांनी मी अवाक् होऊन ऐकत असायचो. त्यांना शक्य असेल त्या ठिकाणी



Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani

Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn.)

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

पथकर आपल्या चालीतून अनेकांना भुरळ पाडतो. थेटपणे बोलतो, मुक्तपणे फिरतानाही कामाशी बांधून घेणारा अनेक साहित्य, साहित्यिकांना ओळखणारा, सहजपणे आमच्यासारख्या सुशिक्षितांची ओळख करून देण्यासाठी आग्रहाने सोबत घेऊन जाणारा हा अवलिया की, माणसांविषयी प्रेम असणारा धकाधकीच्या काळातही आपल्या जगण्यातून इतरांना कामाप्रति कसा जीव लावावा, त्याची शिकवण देणारा, वर्गात न बसताही अनेकांचे शिक्षक असणारे हे समुद्रगुप्त पाटील कायमच मनात कोरले गेलेले नाव आहे.

समुद्रगुप्त पाटील आणि माझा परिचय अनेक वर्षांपूर्वीचा आहे, असे मात्र नाही. नव वर्षे, सण यानिमित्ताने फोनवरून शुभेच्छा देण्यास ते कधी विसरत नाहीत. सात-आठ वर्षांपूर्वी त्यांचा फोन शेजारी असणाऱ्या फोनवर रात्री अकरा वाजता आला असेल. सर्व झोपी गेलेली असताना फोनचा आवाज आल्याने सर्व विचारात पडले की, मध्यरात्रीला फोन कोणाचा असेल, शेजारील आजोबा मला उठवत म्हणाले फोन आलाय. मी झोपीतच फोन उचलला तर फोनवर समुद्रगुप्त पाटील, मी नमस्कार म्हणताच, म्हणाले, ''पाडव्याच्या शुभेच्छा द्यायच्या राहून गेल्या, दिवसभर कामानिमित्त बाहेरच होतो. आता आठवण झाली नि फोन लावला.'' ही स्वाभाविक अन् सहजवृत्ती मनाला भावणारी होती. अलीकडे माणसे बोलण्यापेक्षा संदेश लिहून एकाच वेळी अनेकांना पाठवून जबाबदारीतून मुक्त झाल्याचे दाखवतात. तेव्हा अशी माणसेच का इतकी जिव्हाळ्याची अन् आपुलकीची वाटतात, त्याचे उत्तर मिळू लागते.

– प्रा. डॉ. शिवसांब कापसे

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn.) Estd. 1993

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani